# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## मंगळवार, दिनांक १७ मार्च, २०२६

## (सकाळी १०-०० ते ११-४५ वाजता)

**(क)** **म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा—**

**(शुक्रवार, १३ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा) —**

**सर्वश्री विक्रांत पाटील,** प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, **वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा —**

"MRTP-अधिनियमातील कलम १८ मधील तरतुदीनुसार ग्रामीण भागातील (गावठाणाबाहेरील) विकास परवानगी देण्याचे अधिकार सद्य:स्थितीत जिल्हाधिकारी व त्याबाबत पूर्व परवानगी ही सहायक संचालक, नगररचना अधिकारी, जिल्हा कार्यालय यांना असल्याने विकास परवानगी मिळणेकरिता ग्रामीण भागातील नागरिकांना भौगोलिकदृष्ट्या जवळ नसलेल्या जिल्हा मुख्यालयात जावे लागत असणे, जिल्हा स्तरावरील वाढता कामाचा व्याप, वेळेत परवानगी न मिळणे व त्यामुळे अनधिकृत बांधकामे वाढत तर आहेतच सोबत विकास परवानगी अभावी नागरिकांना संस्थात्मक वित्तपुरवठा मिळत नसणे, तसेच पायाभूत-सुविधांची जबाबदारी असलेल्या ग्रामीण स्वराज्य संस्थांना विचारात न घेताच जिल्हास्तरीय परवानगी देण्यात येणे (नागरी स्थानिक संस्थेप्रमाणे ७३ व्या घटनादुरुस्तीने ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेस घटनात्मक दर्जा प्राप्त), सध्या प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी नगरपालिका किंवा नगर पंचायत कार्यालय असून शहरी भागातील विकास परवानग्या देण्याचे कामकाज मुख्याधिकारी व पूर्व परवानगी देण्याचे कामकाज टाऊन प्लॅनर/सहाय्यक टाऊन प्लॅनर यांचे मार्फत BPMS प्रणालीद्वारे दिले जाणे, त्यामुळे शहरी भागातील नागरिकांना सर्व परवानग्या वेळेत व हाकेच्या अंतरावर मिळत असताना ग्रामीण भागातील जनतेला अन्यायाला सामोरे जावे लागणे, सध्या संपूर्ण महाराष्ट्राचा प्रादेशिक नियोजन आराखडा तयार झाला असून संपूर्ण महाराष्ट्रभर एकत्रीकृत विकास प्रोत्साहन नियमावली लागू झाली असल्याने ग्रामीण भागातील नियोजन विषयक कामकाज व विकास परवानग्या या तालुकास्तरीय ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत व पूर्व परवानगी कामकाज हे तालुक्यातील नगरपंचायतीत उपलब्ध असलेल्या टाऊन प्लॅनर/ सहाय्यक टाऊन प्लॅनर यांच्याकडून देण्यात याव्यात ही ग्रामीण भागातून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(ख) अर्धा-तास चर्चा म.वि.प. नियम ९२ अन्वये –**

**(मंगळवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२६, गुरूवार, दिनांक ५ मार्च, २०२६ व गुरूवार, दिनांक १२ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु प्रलंबित असलेली अर्धा-तास चर्चेची सूचना) [अनुक्रमांक १]**

**(१) सर्वश्री विक्रम काळे, अमोल मिटकरी, शिवाजीराव गर्जे, वि.प.स.**

"**राज्यातील शाळांना सन २०२४-२५ या वर्षाची पटसंख्या ग्राह्य धरून अनुदान मिळणेबाबत**" या विषयावरील **श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे, वि.प.स. यांचा** तारांकित प्रश्न क्रमांक ५३२३ ला दिनांक ८ डिसेंबर, २०२५ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**(गुरुवार, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२६, गुरूवार, दिनांक ५ मार्च, २०२६ व गुरूवार, दिनांक १२ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु प्रलंबित असलेली अर्धा-तास चर्चेची सूचना) [अनुक्रमांक २]**

**(२) सर्वश्री सतेज उर्फ बंटी पाटील, अशोक उर्फ भाई जगताप, जयंत आसगावकर, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"सावंतवाडी, दोडामार्ग, वेंगुर्ले (जि.सिंधुदूर्ग) तालुक्यांमध्ये डेव्हलपमेंट झोन येणार असल्याने शासन जमिनी संपादीत करणार असल्याचे सांगुन स्थानिक शेतकरी व बागायतदारांकडून त्यांच्या मोक्याच्या जमिनी नाममात्र दराने विकत घेतल्या जात असल्याचे प्रकार वाढत असून यामध्ये येथील काही मध्यस्थ व परप्रांतीय गुंतवणूकदार सक्रीय झाले असणे, यामुळे येथील स्थानिक शेतकरी व बागायतदार भूमिहीन होत असल्याने गाव सोडून जात असणे, याबाबत शासनाने तातडीने माहिती घेवून येथील मध्यस्थ व परप्रांतीय गुंतवणूकदार तसेच त्यांच्याशी संगनमत करणारे संबंधित शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कठोर कारवाई करण्याची गरज असणे व स्थानिक शेतकऱ्यांना भूमिहीन होण्यापासून रोखण्याची आवश्यकता असणे याकरीता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(बुधवार, दिनांक ४ मार्च, २०२६, गुरूवार, दिनांक ५ मार्च, २०२६ व गुरूवार, दिनांक १२ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) [अनुक्रमांक ३ व ४]**

**(३) सर्वश्री संजय खोडके, विक्रम काळे, अमोल मिटकरी, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्य शासनाकडून शेतकऱ्यांकडील सोयाबीन हमीभावाने (MSP) खरेदी करण्यासाठी आखण्यात आलेले धोरण अंमलात आणताना विविध प्रशासकीय व कार्यात्मक अडचणी निर्माण होत असल्याचे निदर्शनास येत असणे, विशेषतः सोयाबीनचे उत्पादन बाजारात येण्याच्या कालावधीत तात्काळ खरेदी सुरू करणे आवश्यक असताना अनेक ठिकाणी MSP खरेदी केंद्रे वेळेवर सुरू न होता उशिरा सुरू केली असणे, परिणामी, शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाची वेळेवर विक्री करता येत नसणे, गरजेनुसार खरेदी केंद्रांची संख्या निश्चित न करणे, खरेदी कालावधीबाबत स्पष्ट व पूर्वनियोजित वेळापत्रक जाहीर न करणे, तसेच प्रशासनाकडील परवानगी प्रक्रिया, मंजुरीतील विलंब आणि धोरणात्मक अनिश्चितता यांमुळे खरेदी केंद्रे वेळेवर सुरू करण्यात अडथळे येत असणे, काही केंद्रांवर सोयाबीनच्या आर्द्रता टक्केवारी व गुणवत्ता (FAQ Standard) संदर्भातील निकषांमुळेही खरेदी प्रक्रियेत अडचणी निर्माण होत असणे, तसेच काही प्रकरणांमध्ये शेतकऱ्यांकडे सोयाबीन शिल्लक असतानादेखील खरेदी केंद्रे अकाली बंद करण्यात आल्यामुळे शेतकऱ्यांना हमीभावाने विक्रीची संधी मिळत नसणे, त्यामुळे शेतकऱ्यांना कमी दराने खुल्या बाजारात विक्री करावी लागत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(४) श्रीमती उमा खापरे, सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच मान्यता प्राप्त खाजगी अंशतः अनुदानित, विनाअनुदानित व १०० टक्के अनुदानित शैक्षणिक संस्थांमध्ये दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी नियुक्त होऊन नंतर १०० टक्के अनुदानावर आलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्तीवेतन योजना (OPS) लागू करावी, याबाबत विविध शिक्षक संघटना शासनाकडे वारंवार निवेदने सादर करीत असून याबाबत मा.सर्वोच्च न्यायालय यांनी निर्देश दिलेले असूनही शासनाने अद्याप अंतिम निर्णय जाहीर केलेला नसणे, शासकीय, निमशासकीय, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या समन्वय समितीच्या नेतृत्वाखाली राज्यातील सुमारे १७ लाख कर्मचारी व शिक्षक दिनांक १४ मार्च ते २० मार्च, २०२३ या कालावधीत बेमुदत संप पुकारलेला असणे, त्यानंतर माजी मुख्य सचिव श्री.सुबोध कुमार यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास समिती नियुक्त करुन उक्त समितीस दिनांक १४ जून, २०२३ पर्यंत तीन महिन्यांची मुदत देण्यात आली असणे, याच अनुषंगाने जुनी पेन्शन समन्वय संघाच्या नेतृत्वाखाली दिनांक ३ मे, २०२३ पासून आझाद मैदान येथे बेमुदत आंदोलन सुरू असून दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी अनुदानित, विनाअनुदानित किंवा अंशतः अनुदानित शैक्षणिक संस्था, वस्ती

शाळा तसेच इतर विभागांमध्ये जनसेवक म्हणून नियुक्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या एकूण संख्येची अद्ययावत माहिती उपलब्ध करून देणे आवश्यक असणे, तसेच, दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी सेवेत असलेल्या अनेक शिक्षकांची जीपीएफ खाती सुरू असली तरी त्यामध्ये हप्त्यांची कपात सध्या होत नसणे, सन २००५ नंतर शासनाने शासकीय, निमशासकीय सेवा तसेच नगरपालिका, महानगरपालिका व इतर अनुदानित शाळांमधील सुमारे १६,१०,००० शासकीय कर्मचारी व सुमारे ७,००,००० मान्यताप्राप्त शिक्षक/कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू न करता नवीन निवृत्तीवेतन योजना (NPS) लागू केलेली असणे, डीसीपीएसमधील (DCPS) जमा रक्कम अद्याप एनपीएसमध्ये वर्ग झालेली नसल्याने संबंधित कर्मचाऱ्यांना अचूक आर्थिक तपशील उपलब्ध होत नसणे, काही कर्मचाऱ्यांची एनपीएस खाती अद्याप सुरू झालेली नसल्याची बाब निदर्शनास येणे, नगरपालिका व महानगरपालिका शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहावा व सातवा वेतन आयोगाचे हप्ते प्रलंबित असल्याच्या तक्रारी असणे, विभागाच्या शासन निर्णयानुसार दिनांक १ नोव्हेंबर, २००५ रोजी व त्यानंतर राज्यातील जिल्हा परिषद तसेच मान्यता प्राप्त खाजगी १००% अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयांतील १००% अनुदानित पदावरील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी, जे परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (DCPS/NPS) सदस्य आहेत, त्यांचा सेवेत असताना मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबास कुटुंब निवृत्तीवेतन व मृत्यू उपदान तसेच रुग्णतेमुळे सेवानिवृत्त झाल्यास रुग्णता निवृत्तीवेतन व सेवानिवृत्ती उपदान देण्याबाबत Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982 मधील तरतुदीनुसार कुटुंब निवृत्तीवेतन व रुग्णता निवृत्तीवेतन लागू करण्याचा विषय शासनाच्या विचाराधीन असणे, उक्त प्रकरणी शासनाने सविस्तर चौकशी करुन समितीच्या अहवालातील शिफारशींनुसार दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी व त्यानंतर नियुक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्तीवेतन योजना लागू करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(सोमवार, दिनांक ९ मार्च, २०२६ व गुरूवार, दिनांक १२ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु प्रलंबित असलेली अर्धा-तास चर्चेची सूचना) [अनुक्रमांक ५]**

**(५) सर्वश्री अभिजित वंजारी, सुधाकर अडबाले, अशोक उर्फ भाई जगताप, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"नागपूर येथील कोराडी औष्णिक वीज केंद्रात ६६० मेगावॅट क्षमतेचे युनिट क्रमांक ८, ९, १० असे तीन युनिट सन २०१० ते २०१७ या कालावधीत उभारले असणे, या प्रकल्पांना केंद्रीय पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयांने दिनांक ४ जानेवारी, २०१० रोजी पर्यावरणीय मान्यता दिली असणे, परंतु या

प्रकल्पासाठी केंद्रीय वने व हवामान बदल पर्यावरण मंत्रालयाने मंजूरी देताना विनिर्दिष्ट केलेल्या अटींचे पालन करण्यात महाजेनको अपयशी ठरणे, तसेच कोराडी प्रकल्पाला वातावरणातील हवेची गुणवत्ता राखण्यात अपयश आले असणे, १०० टक्के फ्लाय अ‍ॅश वापराचे उल्लंघन होणे, राख साठवण तलावात फ्लाय अ‍ॅश योग्यप्रकारे व्यवस्थापित न करणे, पर्यावरणीय नियमांचे उल्लंघन करणाऱ्या या गंभीर कृत्यांमुळे राष्ट्रीय हरीत लवादाने महाजेनकोला ५ कोटी रूपयांचा दंड ठोठावला असणे महाजेनकोच्या निष्काळजीपणामुळे मोठ्या प्रमाणात प्रदुषण वाढल्यामुळे नागपूरातील हवेची गुणवत्ता खराब होऊन मानवी जीवनावर आरोग्य विषयक गंभीर परिणाम होणे याकरिता शासनाकडून करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

**(मंगळवार, दिनांक १० मार्च, २०२६ व गुरूवार, दिनांक १२ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु प्रलंबित असलेली अर्धा-तास चर्चेची सूचना) [अनुक्रमांक ६]**

**(६) सर्वश्री सत्यजीत तांबे, किशोर दराडे, विक्रम काळे, वि.प.स.**

"**मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी योजना बंद केल्याबाबत**" या विषयावरील **डॉ. परिणय फुके व इतर वि.प.स. यांचा** तारांकित प्रश्न क्रमांक ५१३३ ला दिनांक १३ डिसेंबर, २०२५ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**(बुधवार, दिनांक ११ मार्च, २०२६ व गुरूवार, दिनांक १२ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु प्रलंबित असलेली अर्धा-तास चर्चेची सूचना) [अनुक्रमांक ७]**

**(७) डॉ. परिणय फुके, श्री. प्रविण दरेकर, अ‍ॅड. निरंजन डावखरे, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील**.

"राज्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील सुशिक्षित बेरोजगारांना स्वयंरोजगारासाठी अर्थसहाय्य देण्याच्या उद्देशाने महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ आणि संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार महामंडळांची स्थापना करण्यात आली असणे, मात्र सन २०१० पासून ८५ टक्के कर्जदारांची सुमारे ८०० कोटी रुपयांची थकबाकी प्रलंबित असल्याने या महामंडळास आर्थिक चक्र पूर्णपणे कोलमडले असून महामंडळे आर्थिकदृष्टया दुर्बल झाली असणे, तसेच वसुलीसाठी स्थापन केलेल्या प्रादेशिक वॉर रूम आणि संगणकीकृत मॉनिटरिंग प्रणालीचा परिणाम दिसून येत नसणे, प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे वसुलीची गती मंदावली असणे, यामुळे नवीन पात्र लाभार्थ्यांसाठी कर्ज उपलब्ध करून देण्यास

महामंडळे असमर्थ ठरत असून मागासवर्गीय युवकांच्या रोजगाराचा प्रश्न अधिक गंभीर झाला असणे, शासनाला पुन्हा ५७० कोटी रुपयांची नवीन शासकीय हमी द्यावी लागत असणे, जो थेट शासकीय निधीचा अपव्यय असणे, शासन यंत्रणेने थकबाकी वसुलीसाठी ठोस धोरण राबवून महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ आणि संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार महामंडळ या महामंडळांना आर्थिक अडचणीतुन बाहेर काढणे आवश्यक असणे यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(गुरुवार, दिनांक १२ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) [अनुक्रमांक ८ व ९]**

(८) **सर्वश्री अशोक उर्फ भाई जगताप, सतेज उर्फ बंटी पाटील, अभिजित वंजारी, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यात विवाहप्रसंगी हुंडा घेणे हा कायद्याने दंडनीय गुन्हा असणे, तथापि, प्रत्यक्षात ग्रामीण भागातील गावे व तांडे तसेच शहरी भागामध्येही रोख रक्कम, सोन्याचे दागिने, दुचाकी किंवा चारचाकी वाहने इत्यादी स्वरूपात हुंडा देणे-घेणे सुरू असल्याचे दिसून येत असणे, या प्रथेमुळे प्रत्येक मुलीच्या पालकांना त्यांच्या मुलींच्या विवाहासाठी मोठ्या प्रमाणावर आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत असणे, अनेक वेळा विवाहाचा संपूर्ण खर्चही मुलीच्या पालकांनाच करावा लागत असल्याचे आढळून येणे, परिणामी या सामाजिक प्रथेमुळे आर्थिक ताण सहन न झाल्याने काही मुलींच्या पालकांनी आत्महत्या केल्याची उदाहरणेही आढळून येत असणे, तसेच पालकांचे होणारे दुःख आणि आर्थिक ताण पाहून काही मुलीही आत्महत्येसारखा अत्यंत दुर्दैवी निर्णय घेत असणे, या पार्श्वभूमीवर हुंडा प्रतिबंधक कायद्यातील तरतुदींची प्रभावी व परिणामकारक अंमलबजावणी करणे तसेच या प्रथेविरोधात व्यापक जनजागृती करणे अत्यंत आवश्यक असणे, मात्र याबाबत शासनाकडून अपेक्षित प्रभावी कार्यवाही होत नसल्याची भावना जनतेमध्ये व्यक्त होत असून त्यातून नाराजी व असंतोष निर्माण होत असल्याचे दिसून येत असणे, या पार्श्वभूमीवर राज्यात हुंडा प्रतिबंधक कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी तसेच या प्रथेविरोधात व्यापक जनजागृती करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(९) **सर्वश्री विक्रांत पाटील, प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यातील अनेक युवक बेरोजगारीमुळे नैराश्यपूर्ण जीवन जगत असणे, युवकांच्या सर्वांगीण कल्याणासाठी तसेच त्यांना आवश्यक समुपदेशन व मार्गदर्शन मिळावे यासाठी राज्यस्तरावर "महाराष्ट्र राज्य युवा कल्याण आयोग" अथवा तत्सम प्राधिकरण स्थापन करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, अनेक युवकांना योग्य वयात योग्य मार्गदर्शन व आर्थिक पाठबळ मिळत नसल्यामुळे ते दिवसेंदिवस दिशाहीन होत असल्याचे दिसून येत असणे, याशिवाय, शिक्षणाच्या पात्रतेनुसार रोजगाराच्या संधी अत्यल्प प्रमाणात उपलब्ध असणे, युवकांसाठी शासनाच्या विविध विभागांमार्फत अनेक योजना राबविण्यात येत असून त्या योजनांच्या अंमलबजावणीत आवश्यक समन्वयाचा अभाव असल्यामुळे अनेक युवकांना शासनाच्या योजनांचा लाभ घेताना विविध अडचणींचा सामना करावा लागत असणे, तसेच परदेशात शिक्षण घेण्यासाठी किंवा नोकरी करण्यासाठी युवकांना वेळोवेळी योग्य मार्गदर्शन मिळणे आवश्यक असणे, प्रत्येक जिल्ह्यातील पुढील दहा वर्षांमध्ये अपेक्षित असलेल्या प्रकल्पांचा विचार करून त्यानुसार युवकांना आवश्यक कौशल्य प्रशिक्षण उपलब्ध करून देण्याची गरज असणे, दहावी, बारावी किंवा पदवी शिक्षण पूर्ण केल्यानंतर पुढे कोणता मार्ग निवडावा याबाबत अनेक युवकांच्या मनात संभ्रम निर्माण होत असणे, काही युवक उदरनिर्वाहासाठी योग्य साधन उपलब्ध न झाल्यामुळे व्यसनाधीनतेकडे आकर्षित होत असल्याचे दिसून येत असणे, परिणामी गुन्हेगारीचे प्रमाण वाढण्याची शक्यता निर्माण होत असणे, युवकांच्या कल्याणासाठी शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना व उपक्रम प्रभावीपणे त्यांच्यापर्यंत पोहोचविण्यात अपयश येत असल्यामुळे युवकांमध्ये शासनाविषयी असंतोषाची भावना निर्माण होत असून शासनावरील विश्वासही काही प्रमाणात कमी होत असल्याचे दिसून येत असणे, या पार्श्वभूमीवर युवकांना आपले प्रश्न मांडण्यासाठी योग्य व्यासपीठ उपलब्ध व्हावे, त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक मार्गदर्शन व सहाय्य मिळावे तसेच विविध योजनांमध्ये समन्वय साधला जावा यासाठी कौशल्य विकास विभागाच्या अंतर्गत "महाराष्ट्र राज्य युवा आर्थिक कल्याण आयोग" अथवा तत्सम प्राधिकरण स्थापन करण्याची मागणी होत असणे, याबाबत युवकांच्या हितासाठी, कल्याणासाठी आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(सोमवार, दिनांक १६ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) [अनुक्रमांक १० व ११]**

**(१०) सर्वश्री जगन्नाथ अभ्यंकर, किरण सरनाईक, ज्ञानेश्वर म्हात्रे, वि.प.स पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील**.

"पाचव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीमुळे शासनाच्या तिजोरीवर अतिरिक्त आर्थिक भार निर्माण झाला असणे, या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने नवीन पदनिर्मिती तसेच रिक्त होणाऱ्या पदांच्या भरतीवर काही काळासाठी बंदी घातली असणे, तथापि शिक्षकांची पदे दीर्घकाळ रिक्त राहिल्यास त्याचा विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेऊन शासनाने मानधन तत्त्वावर शिक्षकांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला असणे, त्या अनुषंगाने तीन वर्षांच्या कालावधीसाठी मानधनावर नियुक्त होणाऱ्या शिक्षकांना "शिक्षण सेवक" असे नामाभिधान देण्यात आले असणे, यासंदर्भात मा.उच्च न्यायालयामध्ये दाखल करण्यात आलेल्या याचिकेवरील सुनावणीदरम्यान न्यायालयाने शिक्षकांचे होत असलेले आर्थिक शोषण अमान्य असल्याचे स्पष्ट केले असणे, त्यावेळी शासनाच्या तत्कालीन प्रधान सचिवांनी न्यायालयास सादर केलेल्या प्रतिज्ञापत्राद्वारे "शिक्षण सेवक योजना" ही तात्पुरत्या स्वरूपाची असून राज्य शासनाची आर्थिक परिस्थिती पूर्ववत झाल्यानंतर ही योजना रद्द करण्यात येईल, असे आश्वासन दिले असणे, मात्र शासनाकडून सादर करण्यात आलेल्या प्रतिज्ञापत्रातील आश्वासनाचा विसर पडल्याचे दिसून येत असणे, शिक्षण सेवक योजना सुरू होऊन जवळपास दोन तपांचा कालावधी होऊनही शिक्षकांचे आर्थिक शोषण करणारी ही योजना अद्याप सुरू असल्याचे निदर्शनास आले असणे, तसेच शिक्षकांच्या रिक्त पदांच्या भरतीवर दिनांक २ मे, २०१२ पासून सातत्याने घालण्यात आलेल्या निर्बंधांमुळे अनेक शिक्षकांचा सेवाप्रवेश उशिरा होत असणे, परिणामी सेवेत दाखल होण्याची कमाल वयोमर्यादा गाठण्याच्या अवस्थेत शिक्षकांना नोकरी मिळत असून २० ते २५ वर्षांच्या एकूण सेवाकाळामधील पहिली तीन वर्षे अत्यल्प मानधनावर "शिक्षण सेवक" म्हणून काम करावे लागत असणे, यामुळे शिक्षकांमध्ये मोठ्या प्रमाणावर नैराश्य, अनास्था तसेच भविष्यासंबंधी असुरक्षिततेची भावना निर्माण होत असणे, या पार्श्वभूमीवर शिक्षकांचे आर्थिक शोषण थांबविण्यासाठी आणि त्यांच्या सेवेस योग्य न्याय देण्यासाठी "शिक्षण सेवक योजना" रद्द करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(११) सर्वश्री सतेज पाटील, अशोक उर्फ भाई जगताप, जयंत आसगावकर, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्य शासनाने प्रशासनातील तसेच महामंडळ, मंडळ व प्राधिकरणातील रिक्त पदे बाह्य यंत्रणेद्वारे आणि कंत्राटी पद्धतीने भरण्याचा निर्णय घेतला असणे, मात्र कंत्राटी कर्मचारी यांच्याकडे कार्यक्षमता व प्रशिक्षण यांचा अभाव असणे, काही महिन्यांपूर्वी बदलापूर येथील शाळकरी अल्पवयीन मुलीवर झालेला निंदणीय अत्याचार तसेच कुर्ला व भांडुप येथे झालेले बेस्ट बसेसचे दुर्दैवी अपघात या घटनेमधील आरोपी कंत्राटी तत्वावर कार्यरत असणे, ही बाब विचारात घेता

शासनाने महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळातील कंत्राटी भरतीबाबत पुर्ण विचार करुन कायम पद भरतीबाबत विचार करण्याची गरज असणे, त्यामुळे प्रशासनातील तसेच महामंडळ व प्राधिकरणांतर्गत रिक्त पदाच्या कायम भरतीबाबत निर्णय घेण्याची आवश्यकता असल्याने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना"

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**(क) तारांकित प्रश्न**

**(ख) तारांकित प्रश्नांची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

"**राज्यातील शिक्षकांना शिक्षक पात्रता परीक्षा अनिवार्य केल्याबाबत**" या विषयावरील श्री. अभिजित वंजारी व इतर वि.प.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक ४८९९ ला दिनांक १३ डिसेंबर, २०२५ रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

**(१) मुख्यमंत्री** : **(क)** "महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (महानिर्मिती) यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सुत्रधारी कंपनी मर्यादित यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा अठरावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(२) उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण)** : "मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक लेखे अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(३) उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** : **(क)** "संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचे सन २०२४-२०२५ या वर्षाचे वार्षिक लेखे" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचे सन २०२४-२०२५ या वर्षाचे वार्षिक लेखे" सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** "डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांचे सन २०२४-२०२५ या वर्षाचे वार्षिक लेखे" सभागृहासमोर ठेवतील.

**(घ)** "गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचे सन २०२४-२०२५ या वर्षाचे वार्षिक लेखे" सभागृहासमोर ठेवतील.

**(ङ)** "कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक यांचे सन २०२४-२०२५ या वर्षाचे वार्षिक लेखे" सभागृहासमोर ठेवतील.

(४) **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** : "महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(५) **वस्त्रोद्योग मंत्री** : "महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्यादित, नागपूर यांचा सन २०२२-२०२३ व सन २०२३-२०२४ या वर्षांचा अनुक्रमे बावन्नावा व त्रेपन्नावा वार्षिक अहवाल आणि वित्तीय पत्रके" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : (क) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास)**

**(ख) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने —**

**(सोमवार, दिनांक १६ मार्च, २०२६ दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनेचे निवेदन (अनुक्रमांक १):-**

(१) **श्री.राजेश राठोड, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ३६ वर सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री निवेदन करतील :-**

डहाणू, जि.पालघर, येथील उपजिल्हा रुग्णालयात गर्भवतींची गैरसोय होत असल्याबाबत.

(२) **श्री.अभिजित वंजारी, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ४१ वर मुख्यमंत्री निवेदन करतील :-**

नरसाळा (जि.नागपूर) येथे गटारलाईनचे ७०० पाईप्स जळून खाक झाल्याबाबत.

(३) **ॲड.अनिल परब, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ४० वर उप मुख्यमंत्री (नगरविकास) निवेदन करतील :-**

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील कनिष्ठ लेखा परिक्षक/रोखपाल पदांवर कार्यरत कर्मचाऱ्यांना पदोन्नती दिल्याबाबत.

(४) **श्री.सचिन अहिर, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ४३ वर उप मुख्यमंत्री (नगरविकास) निवेदन करतील :-**

मुंबई महानगरपालिकेतील मोठ्या पायाभूत प्रकल्पांच्या निविदा प्रक्रियेत झालेली अनियमितता व गैरव्यवहारासंदर्भात.

(५) **श्री.अरुण लाड, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ४४ वर जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री निवेदन करतील :-**

अलमट्टी धरणाच्या उंची वाढीबाबत शासनाने कठोर भूमिका घेणेबाबत.

(६) **श्री.धीरज लिंगाडे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ४७ वर उच्च व तंत्रशिक्षण मंत्री निवेदन करतील :-**

अकोला, वाशिम व बुलढाणा या जिल्ह्यांकरिता बुलढाणा येथे "संत गजानन महाराज" या नावाने विद्यापीठ स्थापन करण्याबाबत.

(७) **श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ४२ वर पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री निवेदन करतील :-**

राज्यातील २३ हजार जलक्षेत्रांचे संरक्षण लाल फितीत अडकल्याबाबत.

**चार : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(सोमवार, दिनांक १६ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) - [अनुक्रमांक (१)] —**

(१) **श्री.किशोर दराडे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सामाजिक न्याय मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"महाराष्ट्र राज्यातील अभियांत्रिकी, पॉलिटेक्निक, फार्मसी, आर्किटेक्चर व इतर उच्च तंत्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शासनाकडून विविध योजनांतर्गत शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क परतावा देण्यात येत असणे, मात्र गेल्या काही वर्षांपासून या शिष्यवृत्तीची रक्कम मोठ्या प्रमाणात प्रलंबित राहिल्याची बाब निदर्शनास येत असणे, अनुसूचित जातीच्या (SC) विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती थेट त्यांच्या बँक खात्यावर जमा होत असणे, संबंधित महाविद्यालयांकडे ती रक्कम जमा होत नसल्यामुळे विद्यार्थी व महाविद्यालय यांच्यात वाद होत असणे, तसेच महाविद्यालयांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असणे, गेल्या सुमारे ९ वर्षांपासून मोठ्या प्रमाणावर NT/OBC विद्यार्थी शिष्यवृत्तीची रक्कम शासनाकडे प्रलंबित असल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे महाविद्यालयांचे नियमित खर्च, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन, तसेच शैक्षणिक सुविधा पुरविणे यावर गंभीर परिणाम होत असणे, आर्थिक ताणामुळे काही महाविद्यालयांकडून विद्यार्थ्यांची मूळ कागदपत्रे (Documents) अडवून ठेवण्याचे प्रकार घडत असल्याच्या तक्रारी देखील समोर येत असणे, परिणामी विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण, नोकरी किंवा प्रवेश प्रक्रियेत अडचणी निर्माण होत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **श्री. वसंत खंडेलवाल, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"महाराष्ट्र हे देशातील एक प्रगत राज्य असून, येथे गेल्या काही दशकांत लोकसंख्येच्या रचनेत मोठया प्रमाणात बदल झाल्याचे दिसून येणे, राज्यातील काही विशिष्ट भागांतील लोकसंख्या वाढीचा दर आणि तेथील स्थलांतरणाचे प्रमाण यामुळे राज्यामध्ये सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय तसेच सुरक्षा पैलुंच्या अनुषंगाने समस्या निर्माण होऊन, सदर बाबींचा उपलब्ध संसाधनांवर प्रचंड ताण पडत असणे, राज्यामध्ये सध्या विवाह, घटस्फोट, वारसाहक्क आणि दत्तक विधान यांसारख्या वैयक्तिक बाबींसाठी वेगवेगळ्या समुदायांचे वेगवेगळे कायदे अस्तित्वात असणे, या कायदेशीर विविधतेमुळे राज्यामध्ये प्रशासकीय तसेच न्यायिक बाबींमध्ये गुंतागुंत निर्माण होऊन त्याचा जातीय एकता व सामाजिक सलोखा यावर विपरीत परिणाम होत असणे, भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद ४४ मध्ये राज्यात नागरिकांसाठी 'समान नागरी कायदा' सुनिश्चित करण्याची मार्गदर्शक तत्त्वे लागू करणे आवश्यक असणे, अलीकडेच उत्तराखंड सारख्या राज्याने हा समान नागरी कायदा लागू केलेला असणे, त्याअनुषंगाने महाराष्ट्र राज्याची अंतर्गत सुरक्षा, सांस्कृतिक अखंडता, सामाजिक ऐक्य आणि सर्वांना समान न्याय मिळण्यासाठी, महाराष्ट्र राज्यामध्ये

'समान नागरी कायदा' लागू करण्याबाबत शासनाची भूमिका व त्याबाबतच्या पुढील उपाययोजना."

(३) **सर्वश्री एकनाथराव खडसे, शशिकांत शिंदे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगर तालुक्यातील मौजे हरताळे येथील गट क्र. ७११, ३२२ व २८७ सह हरताळा ते ओझरखेडा धरणादरम्यान गायरान क्षेत्रात स्टोन क्रशर चालकाने संगनमताने कोणत्याही कायदेशीर परवानगीशिवाय हजारो ब्रास मुरुम आणि दगडाचे बेकायदेशीर उत्खनन केलेले असणे, या अवाढव्य उत्खननामुळे शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडालेला असणे, सदर अवैध उत्खनन ओझरखेडा धरणाच्या भिंतीपासून अवघ्या २०० मीटर अंतरावर ब्लास्टिंग सुरू असून तीव्र स्फोट धरणाच्या सुरक्षिततेसाठी घातक असणे, या स्फोटांमुळे परिसरातील विहिरींच्या पाणीपातळीत घट होणे, यासंदर्भात स्थानिक महसूल यंत्रणेने स्थळ पाहणी करून दोन महिने उलटले तरी अद्याप कोणतीही ठोस फौजदारी कारवाई केलेली नसणे, या प्रकरणाची तांत्रिक व सखोल चौकशी SIT मार्फत करून उत्खनन क्षेत्राची ETS द्वारे अचूक मोजणी करणे आवश्यक असणे, संबंधित स्टोन क्रशर चालकांकडून मागील ६-७ वर्षांत अवैधरित्या हजारो ब्रास गौण खनिजाचे उत्खनन झाले असून त्याद्वारे शासनाचा कोट्यवधींचा महसूल बुडवल्याचे समोर येत असणे, त्याचप्रमाणे तालुक्यातील पुरनाड फाट्यावरील गट नं १९६ मध्ये हजारो ब्रास अवैध उत्खनन करून शेत मालकाने शासनाच्या कोट्यवधी रुपयांची गौण खनिज रॉयल्टी चोरी करणे, या प्रकरणातील दोषींवर दंडात्मक वसुलीसह तात्काळ कठोर फौजदारी गुन्हे दाखल करणे, यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **श्री जगन्नाथ अभ्यंकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"शिक्षण व सेवा योजन विभागाच्या दिनांक १० जानेवारी, १९९२ च्या शासन निर्णयानुसार मुलींची शाळेतील उपस्थिती वाढविण्याच्या हेतूने मुलींच्या पालकांना उपस्थिती भत्ता देय ठरविला जाणे, उपस्थिती भत्ता अनुसूचित जाती, भटक्या जाती व विमुक्त जमातीतील दारिद्रय रेषेखालील मुलींना नियमितपणे शाळेत उपस्थित राहण्यासाठी प्रत्येक मुलीमागे दरदिवशी १ रुपया या दराने मुलींच्या पालकांना उपस्थिती भत्ता दिला जाणे, उपस्थिती भत्त्याचे माहे जानेवारी, १९९२ मध्ये ठरविलेले दर ३४ वर्षानंतर सुद्धा तेच राहणे, मागील ३४ वर्षांमध्ये महागाईचे दर प्रचंड वाढले असताना व १ रुपयाला कोणतेच महत्त्व नसताना उपस्थिती भत्ता म्हणून ३४ वर्षांपूर्वी ठरवलेल्या दरामध्ये कोणताही बदल केला न जाणे, याबाबत विविध संघटनांच्या आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या निवेदनानंतरही उपस्थिती भत्त्याच्या दरामध्ये कोणताही बदल केला न जाणे,

दारिद्र्य रेषेखालील मुलींना शाळेत नियमित उपस्थित राहण्यासाठी प्रोत्साहन देण्यास १ रुपयाचा दर निरूपयोगी ठरणे आणि त्यामुळे मुलींची शाळेमधील उपस्थिती कमी होणे, संभवत: पालकांनी मुलींना नियमितपणे शाळेत पाठविण्यास प्रवृत्त करण्यासाठी उत्तेजनार्थ अथवा प्रोत्साहनात्मक रक्कम वाढविण्याची आवश्यकता निर्माण होणे, वाढलेली महागाई आणि दारिद्र्य रेषेखालील मुलींचे शाळेतील उपस्थितीचे घटलेले प्रमाण याचा विचार करून सन २०२६ -२७ पासून किमान उपस्थिती भत्त्याचे प्रत्येक मुलीमागे दर दिवशी रुपये १० करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(५) **श्री.शिवाजीराव गर्जे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सामाजिक न्याय मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"केंद्र शासनाच्या संरक्षण विभागामार्फत देशभरात २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात एकूण मान्यताप्राप्त ८ शाळा महाराष्ट्र राज्यामध्ये असणे, त्यामध्ये एस.के.इंटरनॅशनल सैनिक स्कूल, सांगली/भोसला मिलिटरी स्कूल, नागपूर/आदर्श पब्लिक स्कूल कुर्डूवाडी, सोलापूर/पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील सैनिक स्कूल, लोणी, अहिल्यानगर / भोसला मिलिटरी स्कूल (मुली) नाशिक / योगेश्वरी शिक्षण संस्था, बीड / यशवंतराव भोसले आंतरराष्ट्रीय विद्यालय, सिंधुदुर्ग / डी.सी. छत्रपती संभाजीनगर शाळेचा समावेश असणे, या सर्व शाळांमध्ये विद्यार्थ्यांना अखिल भारतीय सैनिक शाळा परिक्षा (AISSEE-NTA) मार्फत प्रवेश मिळत असल्यामुळे विविध राज्यातील विद्यार्थी येथे शिक्षण घेत असणे, यामध्ये महाराष्ट्र राज्यातील बरेच विद्यार्थी हे आर्थिकदृष्टया दुर्बल व वंचित घटकातील असणे, हे विद्यार्थी गुणवत्ताधारक असून शैक्षणिक फी भरण्यास असमर्थ असणे, त्यामुळे महाराष्ट्रातील या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाल्यास विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण घेऊन पुढे (NDA, MPSC, UPSC) मध्ये जाऊन आपल्या देशाची सेवा करण्याची इच्छाशक्ती असणे, या परीक्षेत पास होऊन सैनिक स्कूलमध्ये प्रवेश घेणाऱ्या मुलांची संख्या अत्यंत अल्प असणे, राज्य शासनाकडून अनुसूचित जाती-जमाती, विभक्त जाती व भटक्या विद्यार्थ्यांना सामाजिक न्याय विभागाच्या शासन निर्णय दिनांक १७ सप्टेंबर,२००३ नुसार प्रचलित दराने संपूर्ण खर्चाची रक्कम शिष्यवृत्ती म्हणून देण्यात येत असणे, त्याच धर्तीवर सर्वसाधारणपणे एकूण शैक्षणिक फी च्या ५० टक्के जास्तीत जास्त १ लाख एवढी रक्कम वरील नमूद सैनिक स्कूलच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(६) **श्री.दादाराव केचे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सहकार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"वर्धा जिल्ह्यातील जिल्हा उपनिबंधक व मजूर सहकारी संस्था संघ मर्यादित यांच्या संगनमताने भ्रष्टाचारी मार्गाने शासन निर्णय डावलून मर्जीतील मजूर

सहकारी संस्थांना नियमबाह्य काम वाटप करुन मोठ्या प्रमाणात अनियमितता करून व आर्थिक पात्रता प्रमाणपत्र देत असणे, परिणामी अन्य मजूर सहकारी संस्थेत असंतोष निर्माण होत असल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात वारंवार DDR कडे प्राप्त होत असणे, मजूर सहकारी संस्था संघाच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष व व्यवस्थापक यांच्याकडे त्यांच्या नातेवाईकांच्या नावाने प्रत्येकी १०-१२ संस्था असणे, याच मजूर संस्थांना रुपये १० लक्ष खालील कामे नोटीस बोर्डावर न लावता जिल्हा उपनिबंधक व मजूर सहकारी संस्था संघ मर्यादित, वर्धा हे देत असणे, तसेच जिल्हा उपनिबंधक व मजूर सहकारी संस्था संघ मर्यादित, वर्धा कडून स्थानिक मजूर सहकारी संस्थांना कळविल्या जात नसणे, मजूर संघाचे अध्यक्ष/उपाध्यक्ष व व्यवस्थापक (प्रभारी) आपसांत कामे वाटून घेत असणे, वर्धा जिल्ह्यातील जिल्हा मजूर सहकारी संस्था संघ मर्यादित, वर्धाचे अध्यक्ष / उपाध्यक्ष व व्यवस्थापक (प्रभारी) यांच्याच मजूर सहकारी संस्थांना गेल्या अनेक वर्षांपासून सतत कामे देत असणे, वर्धा जिल्हा मजूर संस्थेच्या संघाच्या काम वाटपाची चौकशी करावी तसेच जिल्हा उपनिबंधक यांच्याकडून न्याय मिळत नसल्याने त्यांचीही चौकशी करून दोषींवर कार्यवाही करण्याची आवश्यकता असणे, त्यामुळे वर्धा जिल्हा मजूर सहकारी संघ बरखास्त करून प्रशासकाची नियुक्ती करण्याची गरज असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**पाच : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास)**

**सहा म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा—**

**(१) सर्वश्री. योगेश टिळेकर,** प्रविण दरेकर, ॲड. निरंजन डावखरे, **वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा —**

"पुणे महानगरपालिकेच्या येवलेवाडी विकास आराखड्यामध्ये काही सर्वे नंबर हे रहिवासी करण्यात आले असणे, त्यामध्ये स.नं.४०, ४१, ३६, ३८ यांची कंट्रोल लेव्हल ७०० ते ७१५ मीटर असणे, तसेच स.नं. १५ ची लेवल ही ७७५ मीटर व स.नं. १० मध्ये ७२० मीटर वरती कंट्रोल लेवल असून तेथे रहिवासी झोन करण्यात आला असणे, त्याच वेळेस त्यांना लागून असलेले स.नं. ३१, ३९ व ४०,४१ यांची कंट्रोल लेवल ही साधारण ६८० ते ६९० मीटर वरती असून तरीही ते भाग मध्ये हिल टॉप, हिल्स स्लोप मध्ये दाखवण्यात आले असणे, सर्वे नंबर ४०, ४१ मध्ये प्रस्तावित १८ मीटर डीपी रोड सर्वे नंबर ३९,४०,४१ यातील काही भाग हा प्रस्तावित मध्ये रहिवासी झोन दाखवण्यात आला तसेच सर्वे नंबर ४० मधील रस्ता हा वहिवाटीच्या रस्त्यावरती प्रस्तावित करण्यात आला असणे, सर्वे नंबर ३३, सर्वे नंबर ४ व ३ मधून प्रस्तावित असणारा नऊ मीटर डीपी रस्ता हा सरळ रेषेत नसून वेडा वाकडा असणे आणि सदर रस्त्याचा वाद कोर्टात चालू असणे, येवलेवाडी भागामध्ये नागरी वस्तीचे प्रमाण वाढले असल्यामुळे प्रस्तावित

डीपी मध्ये रहिवासी झोनचे प्रमाण वाढवून सर्वे नंबर व इतर सर्वे नंबरच्या कंट्रोल लेवल प्रमाणे प्रस्तावित रहिवासी झोन करण्याची आवश्यकता, येवलेवाडी येथून सर्वे नंबर २९, २८, २७, ३९ आणि १४ यामधून प्रस्तावित रिंग रोड जात असणे, वरील ठिकाणी लगतचे सर्वे नंबर रहिवासी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **सर्वश्री संजय खोडके,** विक्रम काळे, इद्रिस नायकवडी, वि.प.स. **यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

"राज्यातील इतर विभागांच्या तुलनेत अमरावती विभागातील औद्योगिक स्थिती अत्यंत चिंताजनक असून, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील औद्योगिक घटक आणि सूक्ष्म,लघु व मध्यम उपक्रमांची संख्या संपूर्ण राज्यात या विभागात सर्वात कमी असल्याचे दिसून येणे, हा भाग मुख्य कापूस उत्पादकपट्टा असूनही या विभागात केवळ मोजक्याच मोठ्या उद्योगांची उपस्थिती असणे, उद्योगांच्या अभावामुळे रोजगाराच्या संधीही तुलनेने खूपच कमी असणे, अमरावती येथील 'पीएम मित्र' पार्क हा महाराष्ट्रातील महत्त्वाचा वस्त्रोद्योग प्रकल्प असणे, मात्र येथील जमिनीचे भाव अधिक असल्याने गुंतवणूकदारांमध्ये साशंकता असणे, त्यामुळे हे भाव कमी करणे गरजेचे असणे, तसेच 'पीएम मित्र' पार्कसाठी 'Project Management Consultant' (PMC) किंवा तत्सम विशेष तज्ज्ञ यंत्रणा नेमणे गरजेचे असणे, औद्योगिक वसाहतींमधील मोठ्या प्रकल्पांच्या दिरंगाईबाबत बोलायचे झाल्यास, रेमंड कंपनीला प्लांटसाठी ५०० एकर जागा देण्यात आली असून त्यापैकी केवळ ३८ एकरवर काम सुरू असणे तसेच ठरल्याप्रमाणे ३ शिफ्टमध्ये काम अद्याप सुरू न झाल्याने ते तातडीने सुरू करण्याची आवश्यकता असणे, त्याचप्रमाणे, भारत डायनॅमिक्सला ४०० एकर जागा देऊनही तो प्रकल्प अद्याप सुरू झाला नसल्याने स्थानिक विकासाचे उद्दिष्ट साध्य होण्यात अडथळे येत असणे, औद्योगिक पायाभूत सुविधांच्या सक्षमीकरणासाठी मेगा टेक्स्टाईल पार्कप्रमाणेच इतर उद्योगांसाठीही सांडपाणी प्रक्रिया पुनर्वापर प्लँट (STP/ETP) लावणे गरजेचे आहे, ज्याचा थेट फायदा तेथील इतर उद्योगांना होऊ शकणे, अमरावती विभागातून मालवाहतुकीसाठी येणारा मोठा खर्च कमी करण्यासाठी या भागात 'एक्स्पोर्ट कंटेनर डेपो टर्मिनल' उभारणे ही उद्योजकांची जुनी मागणी असणे, या सर्व बाबींचा विचार करता, अमरावती विभागाच्या औद्योगिक पुनरुज्जीवनासाठी आणि बेरोजगारीचा प्रश्न सोडवण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**सात : शासकीय विधेयके –**

**विधानसभेने संमत केल्याप्रमाणे – विचार, खंडश: विचार व संमत करणे:-**

**(क)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, अभिजित वंजारी, सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

---------------------------------------------------------------------------

**(ख)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २० - महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड. अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, सचिन अहिर, अभिजित वंजारी, राजेश राठोड, अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २० - महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

---------------------------------------------------------------------------

आठ : **(गुरुवार, दिनांक १२ मार्च, २०२६, शुक्रवार, दिनांक १३ मार्च, २०२६ व सोमवार, दिनांक १६ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला प्रलंबित म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) — (मंत्र्यांचे उत्तर)**

(१) **श्री. सतेज उर्फ बंटी पाटील,** ॲड. अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुनिल शिंदे, एकनाथराव खडसे, अभिजित वंजारी, सचिन अहिर, अरुण लाड, राजेश राठोड, जगन्नाथ अभ्यंकर, जयंत आसगावकर, मिलिंद नार्वेकर, धीरज लिंगाडे, सुधाकर अडबाले, **म.वि.प. यांचा नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"इराण, इस्त्रायल आणि अमेरिका यांच्यात सुरु असलेले युध्द, या युध्दजन्य परिस्थितीमुळे राज्यात अत्यावश्यक वस्तू तसेच सर्वसामान्य जनतेशी निगडीत असलेले पेट्रोल, डिझेल, वाणिज्य गॅस यांचा निर्माण झालेला तुटवडा,

यामुळे सर्वसामान्य नागरिकांचे हाल होत असणे, या वस्तूंचा होत असलेला काळाबाजार तसेच शेतीशी संबंधित केळी, कांदा व द्राक्ष इत्यादी निर्यात मालाचे कंटनेर बंदरात पडून असणे, या नाशवंत मालामुळे शेतकऱ्यांच्या बाजारात येणाऱ्या मालाला कवडी मोलाचा भाव मिळणे, परिणामी शेतकऱ्यांना उत्पादन खर्चही मिळत नसल्याने शेतकरी उध्वस्त होणाच्या मार्गावर असणे, युध्दजन्य परिस्थितीमुळे परदेशात अडकलेले राज्याचे नोकरदार व पर्यटक यांच्यासंदर्भात करावयाची उपाययोजना, राज्यात कामगार संहिता लागू केली असून या चार संहिता स्वीकारल्यामुळे कामगारांमध्ये संभ्रम निर्माण झाला असणे, या कायद्याची अंमलबजावणी सुरु करण्यापूर्वी सभागृहाचे विरोधी पक्षातील सदस्य व कामगार नेते यांच्यासह काही सदस्यांची समिती नियुक्त करुन या विषयावर सर्वंकष विचारविनिमय करणे, आरोग्य विभागात औषध खरेदी, औषध पुरवठ्यातील घोटाळे आणि डॉक्टरांची अनुपस्थिती यासारख्या गंभीर अनियमितता आढळल्याने राज्यात आरोग्य व्यवस्थेचा बोजवारा उडालेला असणे, याबाबत शासनाची प्रतिक्रिया तसेच करावयाची उपाययोजना व कार्यवाही."

(२) **सर्वश्री प्रविण दरेकर,** हेमंत पाटील, विक्रम काळे, प्रसाद लाड, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री. सतिश चव्हाण, ॲड. निरंजन डावखरे, श्रीमती भावना गवळी, श्री. पंकज भुजबळ, श्रीमती चित्रा वाघ, सर्वश्री कृपाल तुमाने, संजय खोडके, डॉ. परिणय फुके, सर्वश्री किशोर दराडे, अमोल मिटकरी, श्रीकांत भारतीय, चंद्रकांत रघुवंशी, शिवाजीराव गर्जे, सदाशिव खोत, इद्रिस नायकवडी, दादाराव केचे, अमित गोरखे, वसंत खंडेलवाल, अमरिशभाई पटेल, रणजितसिंह मोहिते-पाटील, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री योगेश टिळेकर, विक्रांत पाटील, संजय केणेकर, राजहंस सिंह, संदीप जोशी, ज्ञानेश्वर म्हात्रे, धर्मगुरू बाबूसिंग महाराज, **म.वि.प. यांचा नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"राज्यात पर्यटन क्षेत्रात खासगी गुंतवणूकीसाठी उत्साहवर्धक आणि अनुकुल वातावरण निर्माण करण्याकरिता 'पर्यटन धोरण-२०२४' जाहिर करण्यात आले असणे, मराठा मिलिटरी लँडस्केप्स संकल्पनेंतर्गत राज्यातील १२ ऐतिहासिक गडकिल्ल्यांचा समावेश युनोस्कोच्या जागतिक वारसा नामांकन यादीत झाल्यामुळे त्यायोगे राज्यातील पर्यटनात वाढ होणार असणे, नागपूरच्या भोसले घराण्याचे संस्थापक राजे रघुजी भोसले यांची ऐतिहासिक दस्तावेज असलेली तलवार राज्य शासनाने जवळपास ४७.१५ लाख रुपयांमध्ये लंडनमधून खरेदी करुन राज्यात आणली असणे, १०० वर्षांहून अधिक मोठी परंपरा असलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवाला 'महाराष्ट्र राज्य महोत्सव' म्हणून घोषित करण्यात आले असणे, पर्यटन व्यवसाय सुरु करु इच्छिणाऱ्या राज्यातील महिलांकरिता 'आई पर्यटन कर्ज योजना' सुरु करण्यात आली असणे, महिला पर्यटकांसाठी एमटीडीसीच्या रिसॉर्टमध्ये ५० टक्के सवलत देण्यात येणे,

राज्यातील तीर्थक्षेत्र विकास आराखडयास ३६६१ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता देण्यात आली असणे, प्रधानमंत्री कुसुम घटक 'ब' योजनेंतर्गत मागेल त्याला सौर कृषीपंप योजनेखाली माहे डिसेंबर, २०२५ या एका महिन्यांमध्ये ४५,९११ सौर कृषी पंप बसवून महाराष्ट्राची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नोंद झाली असणे, आर्थिकदृष्ट्या दुर्बल व दारिद्रयरेषेखालील वीज ग्राहकांसाठी 'स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रुफ टॉप सोलर योजना' सुरु करण्यात आली असणे, 'मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना' कार्यान्वित करण्यात आली असणे, पर्यटनदृष्टया राज्य समृध्द होण्यासाठी व त्यातून आर्थिक स्त्रोत निर्माण होण्यासाठी तसेच ऊर्जेच्या क्षेत्रात राज्य स्वयंपूर्ण होऊन शेतकरी चिंतामुक्त होण्यासाठी करण्यात येत असलेली कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**नऊ : अर्धा-तास चर्चा म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी)**

**(१) सर्वश्री सुधाकर अडबाले, अशोक उर्फ भाई जगताप, राजेश राठोड, वि.प.स पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"**राज्यातील शिक्षकांना अशैक्षणिक कामातून कार्यमुक्त करणेबाबत**" या विषयावरील श्री. सुधाकर अडबाले व इतर वि.प.स. यांचा दिनांक १० डिसेंबर, २०२५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रामांक ६ मधील अतारांकित प्रश्न क्रमांक २३४५६ ला दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**(२) सर्वश्री अमोल मिटकरी, विक्रम काळे, इद्रिस नायकवडी, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"**अकोला जिल्ह्यातील सेतू व आधार केंद्र वाटप प्रक्रियेतील अनियमिततेची चौकशी करण्याबाबत**" या विषयावरील श्री. अमोल मिटकरी व इतर वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ७५०० ला दिनांक २७ फेब्रुवारी, २०२६ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : १६ मार्च, २०२६.

**डॉ. विलास आठवले,**
सचिव-३,
महाराष्ट्र विधानपरिषद.